# वाहतुक शाखा, पुणे शहर
## पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
## बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

पुणे पोलीस

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./८२३९/२०२४ दिनांक :- १७/११/२०२४

## प्रसिद्धिपत्रक

पुणे शहरामध्ये विधानसभा निवडणुक -२०२४ अनुषंगाने स्वारगेट वाहतूक विभागांतर्गत असलेले गणेश कला क्रिडा रंगमंच, येथील मतदान केंद्रावरुन मतदान पथके पी.एम.पी.एम. बसेस द्वारे मतपेट्या घेवुन जाणार असल्याने व पुन्हा जमा करणार असल्याने व सदर भागात पी.एम.पी.एम.एल बस पार्किंगसाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने वाहतूक कोंडी होवू नये. तसेच वाहतूक सुरळीत व सुरक्षित राहण्याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए. ०१९६/८७१/सी.आर.३७ /टी.आर.ए.२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर, खालील नमुद ठिकाणी विधानसभा निवडणुक -२०२४ मतदान प्रक्रियेच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या पी.एम.पी.एम.एल बसेसच्या पार्किंगसाठी जागा उपलब्ध व्हावी म्हणुन खालील प्रमाणे वाहतुकीत बदल करण्यात येत आहे.

- **स्वारगेट वाहतुक विभागातर्गत स्वारगेट ते नेहरु स्टेडियम दरम्यानचे रस्त्यावर दि.१९/११/२०२४ रोजी ०६.०० वा ते १३.०० वा पर्यंत व दि. २०/०११/२०२४ रोजी सांय १८.०० वा. ते २४.०० वा. दरम्यान खालील प्रमाणे वाहतुकीमध्ये बदल करण्यात येत आहे.**

**१) जेधे चौकातुन सारसबागेकडे जाणारी वाहतुक हॉटेल नटराज कडील लेन वर प्रवेश बंद करण्यात येत आहे.**

- **पर्यायी मार्ग –** जेधे चौकातुन सारसबागेकडे जाणारी वाहतुक ओव्हरब्रिज खालील डावीकडील लेनने इच्छित स्थळी जावे.

**२) सोलापुर रोडने जेधेचौक अंडरपासने सारसबागेकडे जाणेस प्रवेश बंद करण्यात येत आहे.**

- **पर्यायी मार्ग –** सोलापुर रोडने येणाऱ्या वाहनांनी जेधे चौक ओव्हर ब्रिज खालील डावीकडे वळण घेवुन होल्गा चौकामध्ये उजवीकडे वळण घेवुन इच्छित स्थळी जावे.

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक पुणे शहर

( अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**